पोलिसवाणी दि 09/02/2023

# फायनान्स कंपनीच्या एजंटना लुटणारे चार चोरटे जेरबंद

मुदखेड : मोटार सायकल चोरांच्या टोळीचा पर्दाफाश केल्यानंतर फायनान्स कंपनीच्या दोन एजंटना दिवसाढवळ्या लुटून मुद्देमाल लंपास करणाऱ्या चार चोरट्यांना जेरबंद करत

**संतोष दर्शनवाड, मुदखेड**



## पोलिसांची धडाकेबाज कामगिरी

स्थानिक पोलिसांनी वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली धडाकेबाज कामगिरी केली असल्यामुळे वेगवेगळ्या घटनेतील चोरट्यांचे धाबे दणाणले असून पोलिसांच्या या धाडसी कारवाईचे अनेकाकडून कौतुक केल्या जात आहे.

गेल्या दोन महिन्यापासून पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये भारत फायनान्स हैदराबाद या कंपनीचे फिल्ड ऑफिसर राम जाधव हे २५ जानेवारी रोजी दुपारी एकच्या दरम्यान फिल्डवरील महिला बचत गटातील सदस्यांच्या कर्ज हप्ते वसुलीची रक्कम घेऊन मुदखेड कडे निघाले असता मुदखेड भोकर रोड डोरली गेट लगत दोन मोटरसायकली अचानक समोर लावून खंजर व तलवारीचा धाक टाकून त्यांच्याकडील एक लाख तीस हजार इतकी रोख रक्कम जबरदस्तीने लुटून घेण्यात आली होती. संबंधिताच्या फिर्यादीनुसार मुदखेड पोलीस ठाण्यात या प्रकरणी अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला होता.

शहरालगत असलेल्या न्याहाळी येथेही फायनान्स कंपनीच्या एजंटास खंजर चा धाक दाखवून रोख रक्कम व मोबाईल टॅब दिवसाढवळ्या लंपास करण्यात आला होता त्यानंतर पोलिसांनी आपल्या कल्पकतेतून या दोन्ही लुटमारीच्या घटना उजेडात आणण्यासाठी तपासास प्रारंभ केला आणि या लुटमारीच्या घटनेमध्ये कोल्हा येथील मदन केशव बट्टेवाड ,भास्कर केशव बट्टेवाड ,आकाश दिगंबर वाघमारे रा. नांदेड ,अजय राठोड ,रा.वरदडा तांडा ,या चार आरोपींना मुदखेड पोलिसांनी

आतील पानावर...